जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 JUN 2021
लोकमत

# विद्यापीठात 'स्पार्क फिल्म फेस्टिवल'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागातर्फे पाचव्या स्पार्क फिल्म फेस्टिवलचे आयोजन 'गुगल मिट' या ऑनलाइन माध्यमातून आज शनिवारी सकाळी अकरा ते दुपारी एक यावेळेत केले आहे. या फेस्टिवलसाठी निर्मिती जाहिरात संस्थेचे अनंत खासबारदार हे प्रमुख उपस्थित असणार आहेत. 'कोविड-१९ आणि आरोग्यविषयक जाहिराती' या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. मास कम्युनिकेशन विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कोरोना काळात घ्यावयाच्या काळजी विषयीच्या आरोग्यविषयक जाहिरातींचे सादरीकरण यावेळी होणार आहे.

19 JUN 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आज ऑनलाईन 'स्पार्क फिल्म फेस्टिव्हल'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने ५ व्या स्पार्क फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन ऑनलाईन माध्यमातून शनिवार (दि.१९) करण्यात आले आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून निर्मिती जाहिरात संस्थेचे अनंत खासबारदार 'कोव्हिड - १९ आणि आरोग्य विषयक जाहिराती' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. मास कम्युनिकेशन विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कोरोना काळात घ्यावयाच्या काळजी विषयीच्या आरोग्यविषयक जाहिरातींचे सादरीकरण केले जाणार आहे. यावेळी विभागाचे माजी विद्यार्थी व लघुपट निर्माते मल्हार जोशी, आकाश बोकमूरकर दिग्दर्शित 'पूर्णविराम' लघुपटाचे स्क्रीनिंग होणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे. यासाठी चित्रपट निर्मात्या अमृता महाडिक, लघुपट निर्माता शैलेश कोरे, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. शिवाजी जाधव यांचे साहाय्य लाभत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2021
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठातर्फे आज स्पार्क फिल्म फेस्टिवल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने पाचव्या स्पार्क फिल्म फेस्टिवलचे आयोजन 'गुगल मिट' या ऑनलाईन माध्यमातून दि. १९ जून रोजी सकाळी ११ ते १ यादरम्यान करण्यात आले आहे. या स्पार्क फिल्म फेस्टिवलचे प्रमुख पाहुणे म्हणून निर्मिती जाहिरात संस्थेचे अनंत खासबारदार आहेत. यावेळी ते कोविड आणि आरोग्यविषयक जाहिराती या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये मनाली पाटील (पॉझिटिव्ह अॅप्रोच), अनुराधा धामणे (लेटस् मास्क अप), निहारिका देशपांडे (सुनो पेनडामिक), प्रणाली पवार (स्टे होम स्टे सेफ), अतुल होवाळे (युज मास्क डिस्पोज प्रॉपरली), विनायक लोहार (जर्म्स आर नॉट फोर शेअरिंग), सोमदत्त देसाई (वी द ह्युमन), या जाहिरातींचे स्क्रीनिंग करण्यात येईल. यावेळी विभागाचे माजी विद्यार्थी आणि लघुपट निर्माते मल्हार जोशी आणि आकाश बोकमूरकर यांनी दिग्दर्शित केलेल्या पूर्णविराम या लघुपटाचे स्क्रीनिंग करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे. यासाठी विशेष साहाय्य चित्रपट निर्मात्या अमृता महाडिक, लघुपट निर्माता शैलेश कोरे, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 JUN 2021
सकाळ

# प्रा. के. एम. गरडकर यांना नामवंत शास्त्रज्ञांमध्ये स्थान

## १५० शोधनिबंध आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध

**सकाळ वृत्तसेवा**

कंदलगाव, ता. १८ : एडी सायंटिफिक इंडेक्स या संस्थेने जाहीर केलेल्या सर्वेक्षणात शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्र विभागातील प्रा. के. एम. गरडकर यांना नामवंत शास्त्रज्ञांमध्ये स्थान मिळाले आहे. प्रा. गरडकर यांनी संशोधन क्षेत्रात भरीव कामगिरी केली असून, त्यांनी १५० हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध केले आहेत. त्यांच्या संशोधनासाठी जवळपास चार हजार सायटेशन, ३७ एच इंडेक्स, ८७ आय इंडेक्स मिळाले आहेत.

प्रा. गरडकर यांची महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्स फेलोपदी निवड झाली आहे. त्यांनी नॅनो मटेरियलसवर संशोधन करून



गरडकर

अर्ध्या तासात रंगमिश्रित पाणी सूर्यप्रकाशाच्या मदतीने शुद्ध करण्याचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. पाना-फुलांच्या मदतीने बहुउपयोगी नॅनो मटेरियल्स उदा. झिंक ऑक्साईड, टिटॅनियम ऑक्साईड, झिरकोनियम ऑक्साईड, सोने-चांदी यांचे सूक्ष्म धातूकण तयार केलेले आहेत.

या सर्वांचा उपयोग पाणी शुद्धीकरणासाठी बायोमेडिकल तसेच रसायनाचे पृथक्करण करण्यासाठी केला जातो. आजपर्यंत प्रा. गरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली १५ विद्यार्थ्यांना पीएच.डी. मिळाली असून, आठ विद्यार्थी विविध विषयांवर संशोधन करीत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2021
तरुण भारत

# वंचित विद्यार्थ्यांची परीक्षा होणार ऑनलाईन

कोल्हापूर : सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात ऑक्टोबर-नोव्हेंबरदरम्यान झालेल्या महाविद्यालयीन पातळीवरील सर्व विद्याशाखांच्या परीक्षा ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आल्या होत्या. मात्र कोरोनामुळे ज्या विद्यार्थ्यांना ऑफलाईन परीक्षा देता आल्या नाहीत, त्यांच्यासाठी पुन्हा परीक्षा घेतल्या जाणार आहेत. काही तांत्रिक अडचणींमुळे ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षाही देता आल्या नाहीत, त्यांच्याकरिताही पुन्हा परीक्षा घेण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडलचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 JUN 2021
Times of India

# SUK declares schedule for winter session re-examination

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has declared the schedule for the graduate and post-graduate winter session re-examination for students, who earlier opted for offline mode to give the exam and those who could not appear for the online mode due to technical issues.

The exams, all held online, will start on June 30. The exams will be conducted in four sessions for over 109 courses. Over 16,000 students have registered for re-exams, including 11,000 who had opted for offline and 5,000, who could not appear for the papers online due to technical issues.

Those who fail to register for online mode will be termed failed for the session. The university had cancelled the offline mode of exams completely due to the Covid situation in three districts-Kolhapur, Sangli and Satara.

File photo



The examinations, to start on June 30, will be held online conducted in four sessions

Gajanan Palase, Shivaji University, Kolhapur's controller of examination, said, "This is the last chance for students to appear for winter session exams. Immediately after the exams, we are planning to start the academic session for next year. The students have been provided with the schedule as per their course. The colleges have been asked to assist the students in case of technical issues."

The online exam for each paper is held for one hour. A total of 25 objective questions will be there, each of two marks.

Meanwhile, online classes will be held for the next academic session if the Covid situation deteriorates.